## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २२६५/२०२२

**अपिलार्थी, श्रीम.लीलाबाई चंद्रकांत घरत**
मु.पो.नविन शेवे,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा महसूल अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड .

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
पनवेल, जुना ठाणा नाका रोड, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०७.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०३.२०२२ | -- | ०२.०५.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०२.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती मिळाली नाही"* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०७.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.चेतन चंद्रकांत घरत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी रीम.निखीता आडे, अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनेवल उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" मौजे नविन शेवा, ता.उरण, जि.रायगड या गावाचे पुर्नवसन ज्या नकाशाच्या आधारे करण्यात आले तो तत्कालीन पुर्नवसनाचा नकाशा. (शेवा गावठाण पुर्नवसन योजना, मौजे बोकडविरा) "*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उपस्थित अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांची जागा जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट साठी संपादित करण्यात आली होती. त्याबदल्यात त्यांना नविन गावात पुर्नवसनात भूखंड क्रमांक १७/१ श्री.वामन कृष्णा घरत, क्षेत्रफळ २०९ चौ.मी. देण्यात आलेला आहे. तथापि या भूखंडाचे कोणतेही अधिकार अभिलेख म्हणजे सातबारा किंवा मिळकत पत्र त्यांना प्राप्त झाले नाही.

संबंधित गावातील तलाठी व उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण यांनी पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे मिळकतीचे अधिकार अभिलेखाच्या कागदपत्रांसह उपस्थित राहणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. उप अधीक्षक, भूमी अभिलेख, उरण व तलाठी सजा नविन शेवा, ता.उरण यांनी पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे मिळकतीचे अधिकार अभिलेखाच्या कागदपत्रांसह स्वतः उपस्थित रहावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.०३.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, उरण, ता.उरण, जि.रायगड.
व
तलाठी सजा नविन शेवा, ता.उरण, जि.रायगड.

**-यांना प्रत**
जन माहिती अधिकारी तथा महसूल अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय,

संगणक-११

जुना ठाणा नाका रोड, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड. **यांचे मार्फत प्रत रवाना.**

**सुनावणी दिनांक १९.०३.२०२५ ( In Continuation of order dt.०७.१०.२०२४)**

**विवेचन**

उपरोक्त दि.०७.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये उप अधीक्षक, भूमी अभिलेख, उरण व तलाठी सजा नविन शेवा, ता.उरण यांना पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे मिळकतीचे अधिकार अभिलेखाच्या कागदपत्रांसह स्वत: उपस्थित रहाण्याबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १९.०३.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगट, सहा.महसुल अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचे युक्तीवादात असे प्रतिपादन केले होते की, त्यांची जागा जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट साठी संपादित करण्यात आली होती. त्याबदल्यात त्यांना नविन गावात पुर्नवसनात भूखंड क्रमांक १७/१ श्री.वामन कृष्णा घरत, क्षेत्रफळ २०९ चौ.मी. देण्यात आलेला होता. तथापि या भूखंडाचे कोणतेही अधिकार अभिलेख म्हणजे सातबारा किंवा मिळकत पत्र त्यांना प्राप्त झाले नाहीत.

आजच्या सुनावणीच्या वेळी नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. तसेच सहाय्यक महसूल अधिकारी, उपविभागीय अधिकारी पनेवल यांचे कार्यालय उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, सदरचे गावठाण सन १९९० साली उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी विविध व्यक्तींना नविन पुर्नवसन गावामध्ये भूखंडाचे वाटप केले होते. त्यावेळी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उरण यांना सदर भूखंडाची मोजणी करुन त्याबाबत कमी जास्त पत्रक पाठविण्याच्या सुचना केल्या होत्या. तथापि कमी जास्त पत्रक प्राप्त न झाल्याने आतापर्यंत ज्या व्यक्तींना भूखंडाचे वाटप झालेले आहे, त्यांचे नावाचा सातबारा झालेला नाही. अजुनही ही जागा सिडकोच्या नावाने आहे.

आजच्या सुनावणीस श्री.गुनीर अत्तार, उप अधीक्षक, भूमी अभिलेख उरण हे देखील उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडून कमी जास्त पत्रक तयार करुन देण्याचे पत्र त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यावर कार्यवाही झाली नाही. तथापि त्यांनी सदरचे पत्र काल प्राप्त करुन घेतले आहे. त्यानुसार ते मोजणी करुन कमी जास्त पत्रक तयार करण्याची कार्यवाही एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करुन, तसा अहवाल तहसिलदार उरण यांचेकडे पाठवतील. तसेच तलाठी बोकडवीरा यांनी सदर व्यक्तींच्या नावे वेगवेगळा सातबारा तयार करुन, त्याची प्रत अपिलार्थी यांना पुरविणे योग्य होईल. सबब सदर प्रकरणात वरीलप्रमाणे कार्यवाही करुन, त्याबाबतचा लेखी अहवाल उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. श्री.गुनीर अत्तार, उप अधीक्षक, भूमी अभिलेख उरण यांनी सदर प्रकरणी मोजणी करुन कमी जास्त पत्रक तयार करण्याची कार्यवाही एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करुन, त्याबाबतचा अहवाल तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांचेकडे पाठवावा. तसेच तलाठी बोकडवीरा, ता.उरण यांनी सदर व्यक्तींच्या नावे वेगवेगळा सातबारा तयार करुन, त्याची प्रत अपिलार्थी यांना पुरवावी.

   सबब सदर प्रकरणात वरीलप्रमाणे कार्यवाही करुन, त्याबाबतचा लेखी अहवाल उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ मार्च, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
उपविभागीय अधिकारी, पनवेल, जुना ठाणा नाका रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.

उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण, ता.उरण, जि.रायगड.

तहसिलदार, तहसिल कार्यालय, उरण,
ता.उरण, जि.रायगड.

तलाठी सजा बोकडवीरा,

संगणक-११

ता.उरण, जि.रायगड.

**सुनावणी दिनांक २१.०५.२०२५ ( In Continuation of order dt.१९.०३.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१९.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये उप विभागीय अधिकारी, पनवेल यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.०५.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पनवेल उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगट, सहाय्यक महसुल अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. तसेच श्री.मुनीर इस्माईल आतार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख उरण व श्री.पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी असे निवेदन केले की, गाव मौजे बोकडविरा, ता.उरण या ठिकाणी नविन शेवा गावाचे पुनर्वसन दि.१७/०२/१९९० साली करण्यात आले. या पुनर्वसनात ३३ हेक्टर जमिन सिडको प्रशासनामार्फत देण्यात आली होती. या विभागातर्फे १० हेक्टर जमिनीवर तातडीने प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले. त्यामुळे पुनर्वसनग्रस्त प्रत्येक नागरिकास किमान ४० चौ.मि.एवढीच जागा देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी गावकऱ्यांनी आपआपल्या सोयीप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात घरे बांधून राहण्यास सुरुवात केली होती. तसेच काही गावकऱ्यांनी पक्की घरे बांधली आहेत.

संपूर्ण ३३ हेक्टर जमिनीवर पुनर्वसन करावयाचे झाल्यास सद्यस्थितीत जे गावकरी तात्पुरत्या पनर्वसन जमिनीवर घरे बांधुन राहत आहेत. त्यांची घरे तोडावीच लागणार आहेत व त्यास गावकऱ्यांचा विरोध आहे. गावकऱ्यांची मागणी अशी आहे की, त्यांच्या ताब्यात असलेली घरे तशीच ठेवून उर्वरित २३ हेक्टर जागेत आराखडा तयार करुन त्याठिकाणी पुनर्वसन शेतकऱ्यांना भूखंडाची वाटणी करण्यात यावी. याबाबतचा निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निर्णय झाल्यानंतर सुधारित लेआऊट नुसार पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जमिनीची मोजणी करुन त्यानुसार उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण यांचेकडून कमी जास्त पत्रक तयार झाल्यानंतर प्रत्येक पुनर्वसन शेतकऱ्यांच्या नावाने त्यांना वाटप करण्यात आलेल्या जागेचा गाव नमुना,सातबारा तयार करण्यात येईल व त्याची प्रत गावकऱ्यांना देण्यात येईल. या कालावधीस अंदाजे ३ महिन्यांचा कालावधी लागेल, असे उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी सांगितले. सबब सदर प्रकरणी पुन्हा सनुावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच उप अधीक्षक, भूमि अभिलेख, उरण व उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच उप अधीक्षक, भूमि अभिलेख, उरण व उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी पुढील सुनावणीच्या वेळी सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल स्वत: उपस्थित राहून सादर करणे योग्य होईल.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०९.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
उपविभागीय अधिकारी, पनवेल, जुना ठाणा नाका रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.

उप अधीक्षक भूमी अभिलेख, उरण, ता.उरण, जि.रायगड.

**सुनावणी दिनांक १०.०९.२०२५ ( In Continuation of order dt. २८.०७.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच उप अधीक्षक, भूमि अभिलेख, उरण व उपविभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील सुनावणीच्या वेळी सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल स्वत: उपस्थित राहून सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल किसन जाधव, नायब तहसिलदार तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपस्थित आहेत. शिरस्तेदार, उप अधीक्षक भूमि अभिलेख उरण उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पनवेल अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांचा लेखी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, मौजे नविन शेवा, ता.उरण या गावच्या पुनर्वसनासाठी जी ३३ हेक्टर जमिन संपादन केलेली आहे त्या जमिनीची तसेच त्यापैकी आजरोजी १० हेक्टर जागेवर ग्रामस्थांची घरे व सार्वजनिक सोयीसुविधा असलेल्या जमिनीची नोजणी करणे आवश्यक आहे. सदर मोजणीनंतर आजरोजी ग्रामस्थांच्या ताब्यात असलेल्या भूखंडाचे क्षेत्र निश्चित होईल व त्यानंतर प्रत्यक्षात देय भूखंडाचे क्षेत्रामधुन ताब्यात असलेल्या भूखंडाचे क्षेत्र वजा करुन उर्वरीत भुखंड वाटपासाठी नव्याने अभिन्यास करणे आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियेसाठी सर्वप्रथम सदर जागेची मोजणी करणे आवश्यक असल्याने सदरची मोजणी फी माफ करावी असे पत्र सरपंच ग्रामपंचायत नविनशेवा यांनी जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाकडे तसेच या कार्यालयाकडे सादर केलेले होते.

ग्रामपंचायत नविन शेवा (मुळ शेवा गाव) या गावातील ग्रामस्थांच्या जमिनी जेएनपीटी साठी सिडको मार्फत संपादीत केलेल्या आहेत. सबब सदर प्रकरणी मोजणी फी भरणेचे झाल्यास याबाबत जेएनपीटी प्रशासनाने सदरची मोजणी फी भरावी असे प्रस्तावित करण्यात आले होते. सदर प्रस्तावानुसार जिल्हाधिकारी रायगड यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १५/०७/२०२५ अन्वये जेएनपीटी प्रशासनाकडे मोजणी फी भरणेबाबत कळविले आहे. मात्र जेएनपीटी प्रशासनाने सदरची जमिन ही आजरोजी सिडकोच्या नावाने असल्याने जेएनपीटीच्या मालकीची नसलेल्या जमिनीची मोजणी फी भरता येणार नाही असे त्यांचेकडील पत्र दिनांक १४.०८.२०२५ अन्वये जिल्हाधिकारी रायगड यांना कळविले आहे.

वरीलप्रमाणे पत्रव्यवहारानंतर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी दिनांक २१.०८.२०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे सर्व संबंधितांची बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये अशा सुचना दिल्या की, सदरची ३३ हेक्टर जमीन प्रथम: जेएनपीटीच्या नावावर करावी व तद्नंतर नविनशेवा ग्रामस्थांना देय असलेले भूखंड वाटपाबाबत अधिकार अभिलेख तयार करणेबाबत पुढील कार्यवाही करता येईल. जिल्हाधिकारी रायगड यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देशानुसार या कार्यालयाकडील पत्र दिनांक २२/०८/२०२५ अन्वये तहसिलदार उरण यांना सिडको विभाग व जेएनपीटी यांचेशी समन्वय साधून अधिकार अभिलेख अद्यावत करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

दि.२१.०५.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी असे निवेदन केले होते की, संपूर्ण ३३ हेक्टर जमिनीवर पुनर्वसन करावयाचे झाल्यास सद्यस्थितीत पुनर्वसन करण्यासाठी घरे तोडावी लागणार आहेत व त्यास गावकऱ्यांचा विरोध आहे. गावकऱ्यांची अशी मागणी आहे की, त्यांच्या ताब्यात असलेली घरे तशीच ठेवून उर्वरित आराखडा तयार करुन त्यासाठी पुनर्वसन शेतकऱ्यांना भूखंडाची वाटणी करण्यात यावी. याबाबतचा निर्णय घेण्यासाठीची प्रक्रिया सुरु आहे. यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निर्णय झाल्यानंतर सुधारित लेआऊटनुसार पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जमिनीची मोजणी करुन उप अधीक्षक उरण यांचेकडून कमी जास्त पत्रक तयार करुन प्रत्येक पुनर्वसन शेतकऱ्यांच्या नावाने त्यांना वाटप करण्यात आलेल्या जागेचा गाव नमुना, सातबारा तयार करण्यात येईल व त्याची प्रत गावकऱ्यांना देण्यात येईल. त्यामुळे याप्रकरणाची सुनावणी तीन महिन्यांच्या कालावधीनंतर आज ठेवली होती. तथापि आज उपविभागीय अधिकारी यांचे तर्फे सादर करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. संपूर्ण कालावधीमध्ये मोजणीची फी कोणी भरावी याबाबत देखील निर्णय होऊ शकलेला नाही. ही कार्यवाही होत नसल्याने, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब होत आहे. तरी याप्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांच्या शपथपत्रसाठी पुढील सुनावणीवर ठेवण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी याप्रकरणामध्ये ते कशाप्रकारे व किती कालावधीमध्ये कार्यवाही पूर्ण करतील याची संपूर्ण रुपरेषा दर्शविणारे शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.१०.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० सप्टेंबर, २०२५.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग,
हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

## सुनावणी दिनांक १३.१०.२०२५ ( In Continuation of order dt. १०.०९.२०२५)

### विवेचन

उपरोक्त दि.१०.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना शपथपत्र सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १३.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल उपस्थित आहेत. श्री.प्रमोद जरग यांचे प्रतिनिधी श्री.महारिंग शि-कावगे, शिरस्तेदार, उप अधीक्षक भूमी अभिलेख उरण उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी श्री.पवन चांडक, उपविभागीय अधिकारी, पनवेल उपविभाग, पनवेल यांनी दि.१०.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घटन करण्यासाठी दि.०८.१०.२०२५ रोजी मा.पंतप्रधान यांचा दौरा असल्याने, प्रतिज्ञापत्र तयार करण्याची कार्यवाही होऊ शकली नाही. सदर प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल करणेकामी पुढील तारीख मिळणेबाबत विनंती करण्यात यावी असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दूरध्वनी संदेशाद्वारे या कार्यालयास कळविणेत आलेले आहे. तरी सदर प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करणेकामी पुढील एक महिन्यानंतरची तारीख मिळणेस विनंती आहे.

त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी शेवटची संधी देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी पुढील सुनावणीच्या दिनांकापूर्वी आपले प्रतिज्ञापत्र सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी आयोगाच्या दि.१०.०९.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचे प्रतिज्ञापत्र पुढील सुनावणीच्या दिनांकापूर्वी आयोगासमोर दाखल करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग,
हिराकोट तलावाजवळ, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

संगणक-११

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

अपिल क्रमांक : के.आर-२२६७/२०२२

अपिलार्थी, श्रीम. लिलाबाई चंद्रकांत घरत,
मु.पो. नविन शेवे,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन),
मेट्रो सेंटर क्र.१, उरण, सिडको नोडल ऑफीस,
अभियांत्रिकी विभाग, द्रोणागिरी, सेक्टर १४,
बोकडविरा, उरण, ता.उरण, जि.रायगड

प्रथम अपीलीय प्राधिकारी, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन),
मेट्रो सेंटर क्र.१, उरण, सिडको नोडल ऑफीस,
अभियांत्रिकी विभाग, द्रोणागिरी, सेक्टर १४,
बोकडविरा, उरण, ता.उरण, जि.रायगड

जन माहिती अधिकारी, तहसिलदार उरण
यांचे कार्यालय,उरण, ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.१०.२०२५

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.३.२०२२ | २९.३.२०२२ | ३१.५.२०२२ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.१२.८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश दादा पाटील, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. उध्दव कदम, तहसिलदार, उरण, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुरेश राठोड, शिरस्तेदार, मेट्रो सेंटर क्र.१, उरण हे समक्ष उपस्थित आहेत. तथापि, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. अविनाशकुमार सोनोने हे ऑनलाईन उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(मौजे नवीन शेवा, ता.उरण, जि.रायगड या गावाचे पुर्नवसन ज्या नकाशाच्या आधारे करण्यात आले तो तत्कालीन पुर्नवसनाचा नकाशा (शेवा गावठाण पुर्नवसन योजना, मौजे बोकडविरा) मिळणेबाबत.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती प्राप्त झालेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणी दरम्यान उपस्थित विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री.उध्दव कदम, तहसिलदार, उरण यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२७.६.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे साध्या टपालाद्वारे माहिती देण्यात आली आहे. तथापि, अशी माहिती प्राप्त झाल्याबाबत अपिलार्थी यांनी नकार दिला. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने विनामूल्य पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वतः उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने निःशुल्क पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वतः उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

अपिल क्रमांक : के.आर-२२६३/२०२२

अपिलार्थी, श्रीम. लिलाबाई चंद्रकांत घरत,
मु.पो. नविन शेवे,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय, उरण, ता.उरण, जि.रायगड ४०७०२. | प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय, उरण, ता.उरण, जि.रायगड ४०७०२ |

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.१०.२०२५

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.३.२०२२ | २९.३.२०२२<br>२२.४.२०२२ | ३१.५.२०२२ | ------- |

अपिलार्थी यांनी दि.२.८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. महेश दादा पाटील, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. उध्दव कदम, तहसिलदार, उरण हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" (मौजे नवीन शेवा, ता.उरण, जि.रायगड या गावाचे पुर्नवसन ज्या नकाशाच्या आधारे करण्यात आले तो तत्कालीन पुर्नवसनाचा नकाशा (शेवा गावठाण पुर्नवसन योजना, मौजे बोकडविरा) मिळणेबाबत) "*

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणी दरम्यान उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.महेश दादा पाटील,निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२७.६.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे साध्या टपालाद्वारे माहिती देण्यात आली आहे. तथापि, अशी माहिती प्राप्त झाल्याबाबत अपिलार्थी यांनी नकार दिला. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने विनामूल्य पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय उरण यांनी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने नि:शुल्क पुरवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५

**अपिल क्रमांक : के.आर- २२६५/२०२२**

**अपिल क्रमांक : के.आर- २२६७/२०२२**

**अपिल क्रमांक : के.आर- २२६३/२०२२**

**सुनावणी दिनांक २६.११.२०२५ ( In Continuation of order dt. १३.१०.२०२५, ३०.१०.२०२५)**

**विवेचन**

अपिल क्रमांक के.आर २२६५/२०२२, के.आर २२६७/२०२२, के.आर २२६३/२०२२ हे तिन्ही प्रकरणी एकाच विषयाशी संबंधित असल्याने या तिन्ही प्रकरणांवर एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे. आदेश

अपिल क्रमांक के.आर २२६५/२०२२ मध्ये आयोगाने दि.१३.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २६.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. श्री.भारत वाघमारे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल जाधव, नायब तहसिलदार तसेच जन माहिती अधिकारी श्री.गोविंद राम सगर, सहाय्यक महसूल अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.महेश पाटील, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, उरण उपस्थित आहेत.

जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी श्री.भारत वाघमारे उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट येथे नवीन अध्यक्षांची नियुक्ती झालेली असल्याने, याप्रकरणात कार्यवाही होण्यास विलंब झाला आहे, परिणामी जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग हे शपथपत्र सादर करु शकले नाहीत. तरी शपथपत्र सादर करण्यासाठी त्यांना एका आठवड्याची वेळ देण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी न चुकता ते सदर प्रकरणात कोणती कार्यवाही करणार आहेत. यासंबंधीच्या कालमर्यादा निश्चित करुन आपले शपथपत्र सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी न चुकता ते सदर प्रकरणात कोणती कार्यवाही करणार आहेत. यासंबंधीच्या कालमर्यादा निश्चित करुन आपले शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.१२.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२५ .